# जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- १०९-२३ दिनांक :- ०५/०४/२०२३

## खुनाच्या गुन्हयातील आरोपीतास आजन्म कारावासाची शिक्षा.

नवघर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०४/८/२०१८ रोजी फिर्यादी नामे श्री. व्हिक्टर रफायल पात्राव, वय ४० वर्षे, रा. रुम नं. २३८ बेलनाथ कॉलनी, गौतम बुध्द मार्ग, मालाड, मुंबई यांनी फिर्याद दिली होती कि, त्यांचा भाउ नामे सायमन रफायल पात्राव यांने भाउ विल्फ्रेड पात्राव याचे बँक खात्यातुन एटीएमव्दारे वीस हजार रुपये काढले म्हणुन विल्फ्रेड पात्राव याने आरोपी सायमन पात्राव यास खात्यातुन पैसे का काढले असे विचारणा केली असता त्यांच्यात भांडण झाले होते. त्यावेळी विल्फ्रेड याने सायमन यास मारण्याची धमकी दिल्याने त्याचा राग मनात धरुन भाउ सायमन याने विल्फ्रेड याचे छातीवर सुरीने वार करुन जीवे ठार मारले होते व मुंडके, डावा हात, दोन्ही हाताचे पंजे धडा वेगळे करुन प्लास्टीक पिशवीत बांधुन टॉयलेट मध्ये लपवुन ठेवले होते. सदर घटनेबाबत नवघर पोलीस ठाणे येथे दिनांक ०४/८/२०१८ रोजी गुन्हा रजि. नं. I २८९/१८ भा.द.वि.कलम ३०२,२०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीत नामे सायमन रफायल पात्राव, वय २९ वर्षे, रा. फलॉट नं. ४०४ जय पांडुरंग को.ऑ.हौ. सोसायटी काशिनगर, भाईंदर पुर्व यास तत्कालिन तपासी अधिकारी यांनी तात्काळ दिनांक ०४/८/२०१८ रोजी वर नमुद गुन्हयात अटक केले होते. सदर गुन्हयाचा तपास पुर्ण झाल्यानंतर नवघर पोलीस ठाण्याचे तत्कालिन वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. राम भालसिंग यांनी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे येथे दोषारोप पत्र दाखल केले होते. वर नमुद अरोपीतास दिनांक ०५/०४/२०१८ रोजी मा. जिल्हा न्यायालय, ठाणे नं. ६ च्या मा. रचना तेहरा यांनी दोषी ठरवुन कलम ३०२ मध्ये आजन्म कारावास व ५००० रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिन्याची साधी कैद तसेच कलम २०१ मध्ये ३ वर्षे सश्रम कारावास व २००० रुपये दंड व दंड न भरल्यास तीन महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे.

------oooo------